महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-०४२५/प्र.क्र.१२८/२०२५/ जाहिरात दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०२५

## -: प्रसिद्धीपत्रक :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी पुढील वर्षामध्ये घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वार्षिक वेळापत्रक माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर मध्ये प्रसिद्ध करण्यात येते. सदर वेळापत्रक प्रसिद्ध करताना आयोगाच्या व स्पर्धा परीक्षा घेणाऱ्या इतर संस्थांच्या परीक्षा एका दिवशी येणार नाहीत, ह्या बाबी विचारात घेऊन वेळापत्रक निश्चित करण्यात येते. शासनाकडून संबंधित संवर्ग/पदांसाठी विहित वेळेत मागणीपत्र प्राप्त होईल; या गृहितकाच्या आधारे अंदाजित वेळापत्रक तयार करण्यात येते. त्यामुळे शासनाकडून विहितवेळेत मागणीपत्र प्राप्त झाल्यासच नियोजित वेळेत जाहिरात प्रसिद्ध करणे व परीक्षेचे आयोजन करणे शक्य होते.

**२.** सन २०२५ चे स्पर्धा परीक्षेचे अंदाजित वेळापत्रक दिनांक २२ नोव्हेंबर, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. सदर वेळापत्रकानुसार परीक्षांचे आयोजन करण्याचा आयोगाकडून काटोकोर प्रयत्न करण्यात आला आहे, तथापि विविध अपरिहार्य कारणास्तव व उमेदवारांचे हित विचारात घेता काही परीक्षा पुढे ढकलण्यात येऊन सुधारित दिनांकास घेण्यात आल्या असल्या, तरी वेळापत्रकातील सर्व परीक्षा सन २०२५ मध्ये घेण्यात आल्या आहेत. सन २०२५ मध्ये आयोगाकडून घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षांची माहिती सोबतच्या परिशिष्ट – १ मध्ये दर्शविली आहे.

**३.** सन २०२५ च्या अंदाजित वेळापत्रकातील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२४ ही परीक्षा शासनाच्या सूचनेनुसार स्थगित ठेवण्याबाबत कळविले असल्याने सदर पदाची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली नाही.

**४.** आयोगाच्या वेळापत्रकानुसार **महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा – २०२५**, दिनांक २८ सप्टेंबर, २०२५ रोजी घेण्यात येणार होती. तथापि, सदर कालावधीत राज्यातील पूरजन्य परिस्थितीमुळे प्रस्तुत परीक्षा सुधारित दिनांकास म्हणजेच, **रविवार दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२५** रोजी घेण्यात येणार आहे. या अनुषंगाने दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२५ रोजी होणारी **महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२५**, **रविवार**, **दिनांक २१ डिसेंबर, २०२५** रोजी घेण्यात येईल. वेळापत्रकानुसार **महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५** दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ रोजी घेण्यात येणार होती. आयोगाचे वेळापत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर संघ लोकसेवा आयोगाकडून देखील सदर दिवशी परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्रसिद्ध केले असल्याने, आयोगास उपकेंद्रे मिळण्यास येणाऱ्या अडचणी विचारात घेता, सदर परीक्षा **रविवार, दिनांक ०४ जानेवारी, २०२६** या सुधारित दिनांकास घेण्यात येईल.

**५.** उपरोक्त दोन्ही परीक्षांसाठीच्या सर्व संबंधित उमेदवारांनी सुधारित दिनांकाची नोंद घ्यावी.

उप सचिव(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई

# परिशिष्ट - १

## Offline Competitive Exam data from 01/01/2025 to 30/09/2025

| Sr. No. | Adv. No. | Name of Post | Actual Date of Exam Conducted | Number of Paper | Mode of Exam |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 048/2024 | Maharashtra Group B Non-Gazetted Services Combined Preliminary Examination 2024 | 02nd February, 2025 | Paper I | Competitive |
| 2 | 053/2025 | Maharashtra State Forest Services Mains Examination 2024 | 10,11,12,13,14 & 15th May, 2025 | Papers-10 | Competitive |
| 3 | 054/2025 | Maharashtra Civil Engineering Services Mains Examination 2024 | 18th May,2025 | Papers-2 | Competitive |
| 4 | 055/2025 | Maharashtra Agriculture Services Mains Examination 2024 | 18th May,2025 | Papers-2 | Competitive |
| 5 | 013/2025 | Maharashtra State Services Mains Examination 2024 | 27,28,29th May, 2025 | Papers-6 | Competitive |
| 6 | 049/2024 | Maharashtra Group C Services Comb. Preliminary Examination 2024 | 01st June, 2025 | Paper I | Competitive |
| 7 | 106/2025 | Maharashtra Group B Non-Gazetted Services Combined Main Examination 2024 | 29th June, 2025 | Paper I & II | Competitive |
| 8 | 118/2025 | Maharashtra Group-C Services Main Examination 2024 | 21st September, 2025 | Paper I & II | Competitive |